# स्मार्ट नाशिक सिटी

नाशिक महानगरपालिका खाजगी प्रकाशन

नाशिक वर्ष १, अंक ७ मासिक वृत्तपत्रिका ऑक्टोबर २०१७


# सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त शहरात एकता दौड

## राष्ट्रमाता माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन

**नाशिक** : नाशिक महानगरपालिकेतर्फे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त राष्ट्रीय एकता दिनानिमित्त 'राष्ट्रीय एकता दौड'चे आयोजन करण्यात आले होते. एकता दौडचा शुभारंभ छत्रपती शिवाजी स्टेडियम येथे विभागीय आयुक्त महेश झगडे, यांनी झेंडा दाखवून केला. ही एकता दौड हुतात्मा स्मारकाजवळून सुरू झाली आणि समारोप हुतात्मा अनंत कान्हेरे (गोल्फ क्लब) मैदानावर झाला.

यावेळी जिल्हाधिकारी राधाकृष्ण बी., मनपा आयुक्त अभिषेक कृष्णा तसेच नाशिक महानगरपालिकेतील विविध प्रशासनातील अधिकारी कर्मचारी या एकता दौडमध्ये सहभागी झाले होते.

दरम्यान महानगरपालिकेच्या वतीने राष्ट्रमाता पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी पुण्यतिथी व राष्ट्रीय संकल्प दिवस सरदार वल्लभभाई पटेल जयंती व राष्ट्रीय एकता दिवस आणि दक्षता जनजागृती सप्ताहनिमित्त कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

इंदिरा गांधी चौक शालीमार येथील श्रीमती इंदिरा गांधी यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास महापौर रंजना भानसी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच मनपा मुख्यालय राजीव गांधी भवन मधील स्वागत कक्ष येथे श्रीमती इंदिरा गांधी व लोहपुरूष सदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस महापौर रंजना भानसी यांनी पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी राष्ट्रीय एकता दिवसानिमित्त उपस्थितांनी शपथ घेतली.

या कार्यक्रमास सभागृहनेते दिनकर पाटील, विरोधी पक्षनेते अजय बोरस्ते, प्रभाग सभापती डॉ. हेमलता पाटील, शाहीन मिर्झा, अतिरिक्त आयुक्त रमेश पवार, किशोर बोर्डे, उपायुक्त हरिभाऊ फडोळ, आर.एम. बहिरम, रोहिदास दोरकुळकर, शहर अभियंता उत्तम पवार, नगररचना सहाय्यक संचालक आकाश बागुल, अग्निशमन दलप्रमुख अनिल महाजन, वैद्यकीय अधिकारी डॉ. विजय डेकाटे, शिक्षण समिती प्रशासन अधिकारी नितीन उपासनी, मिळकत व्यवस्थापक बी.यू. मोरे, कार्यकारी अभियंता उदय धर्माधिकारी, एस.एम. चव्हाणके, जनसंपर्क अधिकारी यशवंत ओगले, हिरामण जगझाप, बाळासाहेब शिंदे, नितीन गंभीरे, गोपीनाथ हिवाळे, सुकलाल पवार, संतोष कान्हे, विरसिंग कामे, विशाल घागरे, हुसेन पठाण तसेच मनपा पदाधिकारी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.















# ७ महिन्यांमध्ये नगररचना विभागाचे १००टक्के वसुली पूर्ण

**नाशिक** : नाशिक महानगरपालिकेच्या नगररचना विभागाकरीता सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाकरिता एकुण ७१.७५ कोटी रूपयांची वसुली उद्दिष्ट देण्यात आली होती. माहे एप्रिल २०१७ ते ऑक्टोबर २०१७ अखेर ७ महिन्यांमध्ये नगररचना विभागाने ठरवून दिलेल्या वसुलीचे उद्दिष्ट्ये नगररचना विभागाकडून १०० टक्के पूर्ण करण्यात आले असून या कालावधीत नगररचना विभागामार्फत एकुण ८३.५० कोटी रूपये इतके उत्पन्न नाशिक महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे.

यामध्ये प्रामुख्याने बांधकाम विकास शुल्क, भुखंड विकास शुल्क, टीडीआर, इन्फ्रास्ट्रक्चर चार्जेस, प्रिमियम एफएसआय व हार्डशिप यामधून नगररचना विभागाला उत्पन्न प्राप्त झालेले आहे. तसेच उर्वरित ५ महिन्यांच्या कालावधीमध्ये त्यामध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**मालमत्ता कर** - वसुली विषयक सन २०१६-१७ व चालू आर्थिक वर्ष सन २०१७ - १८ दिनांक ३१/१०/२०१७ पावेतोचा. (रूपये लाखात)

| विभागचे नावं | सन २०१६-२०१७ दिनांक ३१/१०/२०१६ पावेतोचा वसुल | सन २०१७-१८ दिनांक ३१/१०/२०१७ पावेतोचा वसुल | मागील वर्षा पेक्षा सन २०१७-२०१८ मध्ये झालेली वाढ |
|---|---|---|---|
| सातपूर | ५१३.१८ | ६१७.७५ | १०४.१७ |
| नाशिक पश्चिम | ८३७.२८ | १४१९.०० | ५८१.७२ |
| नाशिक पूर्व | ७७९.५३ | १६३.८६ | १८४.३३ |
| पंचवटी | ६९९.३९ | ८०२.५९ | १०३.२० |
| नवीन नाशिक | ९०२.७२ | १०७२.८५ | १७०.१२ |
| नाशिकरोड | ७८५.९४ | ९००.४६ | ११४.५२ |
| **एकूण** | **४५१८.४४** | **५७७६.५१** | **१२५८.०७** |

मालमत्ता करामध्ये सौरउर्जा, तसेच मनपा करावर माहे एप्रिल ५ टक्के, माहे मे ३ टक्के माहे जून २०१७ - २ टक्के प्रमाणे तसेच ई-पेमेंन्टद्वारे भरणा केलेल्या इ. मिळकत धारकांनी प्राप्त केलेली सवलत धारक व सवलतीमध्ये वसुल झालेल्या रक्कमेचा तपशील. (रूपये लाखात)

| विभागाचे नाव | सौरउर्जा वापर बाबत सद्यलत घेतलेले मिळकत धारक तपशील | | पाच, तीन, दोन टक्के सवलत घेतलेले मिळकत धारक तपशील | | ई-पेमेंन्टद्वारे सवलत घेतलेले मिळकत धारक तपशील | | सवलतीमध्ये एकुण वसुल झालेला मालमत्ता कर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण मिळकत संख्या | सोलर सवलत रक्कम | एकुण मिळत संख्या | सवलत रक्कम | एकुण मिळकत संख्या | सवलत रक्कम | |
| सातपूर | ६१० | ०.६८ | ११७.१७ | १२.८४ | ३५२९ | ०.५६ | ४४८.८८ |
| नाशिक पश्चिम | ७७३ | १.११ | १६४९३ | १९.८८ | ६३२८ | १.४९ | ७०८.९३ |
| नाशिक पूर्व | १०७० | १.१२ | २४३१७ | १४.१२ | ८३४२ | १.१६ | ६००.८१ |
| पंचवटी | १६१६ | १.६३ | १८०६२ | ९.४७ | ६७७७ | ०.८२ | ४२६.२५ |
| नवीन नाशिक | २१७० | १.८२ | २८५०८ | १५.९५ | १०४३४ | १.३८ | ६५१.३५ |
| नाशिकरोड | १४०५ | १.४५ | २५३८४ | १७.६४ | ६४११ | १.०० | ६३९.७२ |
| **एकुण** | **७६४४** | **७.८०** | **१२४४८१** | **८९.९०** | **४१८२१** | **६.४१** | **३४७५.९४** |

**पाणीपट्टी कर** - वसुली विषयक, सन २०१६-१७ व चालु आर्थिक वर्ष सन २०१७-१८ दिनांक ३१/१०/२०१७ पावेतोचा तुलनात्मक तक्ता (रूपये लाखात)

| विभागचे नावं | सन २०१६-२०१७ दिनांक ३१/१०/२०१६ पावेतोचा वसुल | सन २०१७-२०१८ दिनांक ३१/१०/२०१७ पावेतोचा वसुल | मागील वर्षा पेक्षा सन २०१७-२०१८ मध्ये झालेली वाढ |
|---|---|---|---|
| सातपूर | १०२.५१ | २०५.२९ | १०२.७८ |
| नाशिक पश्चिम | १५७.८८ | ३०१.६८ | १४३.८ |
| नाशिक पूर्व | १५२.३७ | ३५१.०० | १९८.६३ |
| पंचवटी | १५५.४२ | २७१.७२ | ११६.३ |
| नवीन नाशिक | २९३.४० | ४७८.५४ | १८५.१४ |
| नाशिकरोड | २०६.२८ | ३८९.१३ | १८२.८५ |
| **एकूण** | **१०६७.८७** | **१९९७.३६** | **९२९.५०** |

पाणीपट्टी थकबाकीदारांना बजविण्यात आलेल्या नोटिस व वसुलीचा तपशील (रूपये लाखात)

| विभागाचे नाव | एकुण वाटप केलेल्या नोटीस संख्या | बकबाकी भरणा केलेले कनेक्शन धारक संख्या | एकुण वसुली रक्कम | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | मागील | चालु | एकुण |
| सातपूर | ११४४५ | २१६० | ५६.६८ | २१.४० | ७८.०८ |
| नाशिक पश्चिम | ३०३९ | १२९७ | ९०.२६ | ४२.६० | १३२.८६ |
| नाशिक पूर्व | १२९१५ | २०८० | ६८.०० | ६१.६२ | १२६.६२ |
| पंचवटी | १४४०८ | १७५० | ३८.४५ | २४.७१ | ९३.१६ |
| नवीन नाशिक | १५०६० | २२२८ | ८१.८६ | ३०.७६ | ११२.६२ |
| नाशिकरोड | १०९७१ | १०३५ | ५४.८० | १९.५९ | ७४.३९ |
| **एकूण** | **६७८३८** | **१०५५०** | **४१७.०५** | **२००.६८** | **६१७.७३** |

ज्या नळ कनेक्शनधारकांनी १५ दिवसाच्या आत थकबाकीची रक्कम भरली नाही अशा नळ कनेक्शन धारकांचे नळ कनेक्शन बंद करण्यात आले होते. मात्र बंद केलेले नळ कनेक्शन अनाधिकृतपणे सुरू केल्यास अशा नळ कनेक्शन धारकांवर नजिकच्या पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात आली होती. मालमत्ता व पाणीपट्टी कर असे दोन्हीही करांची वसुली मागील आर्थिक वर्षापेक्षा दिनांक १/४/२०१७ ते ३१/१०/२०१७ पावेतो एकुण रक्कम रूपये २२ कोटीने वाढलेली आहे.

# 'जागतिक अंतराळ सप्ताहाचे तारांगण येथे उद्‌घाटन'

**नाशिक** : 'नाशिक महानगरपालिका' आणि 'कल्पना युथ फाऊंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने साजरा करण्यात येणाऱ्या 'वर्ल्ड स्पेस विक' अर्थात 'जागतिक अंतराळ सप्ताहचे' महापौर रंजना भानसी यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण तारांगण येथे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमात प्रथमत: नासा स्पेस एज्युकेटर अपूर्वा जाखडी यांनी वर्ल्ड स्पेस विकची पार्श्वभूमी त्याचे महत्त्व तसेच यावर्षी युनोने जाहीर केलेली 'एक्सप्लोरिंग न्यू वर्ल्ड्स इन स्पेस' (Exploring New World's in Space) थीम याविषयी माहिती दिली. जगातील जवळपास ८५ देशांमध्ये ज्याप्रमाणे मोठ्या प्रमाणावर हा सप्ताह साजरा केला जातो, त्याप्रमाणेच नाशिककरांनीही यात आपला सहभाग नोंदवावा असे त्यांनी आवाहन केले.



यानंतर कल्पना युथ फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रोफेसर जयदीप शाह यांनी या सप्ताहात घेतले जाणारे विविध कार्यक्रम व स्पर्धा यांची विद्यार्थ्यांना सखोल माहिती दिली. सध्या अंतराळ क्षेत्रात घडणाऱ्या ताज्या घडामोडी आणि जगभरातील अवकाश संशोधन संस्थांचे चालू असलेले अवकाश कार्यक्रम यावियषी मार्गदर्शन केले. जागतिक अंतराळ सप्ताहाचे तीन वर्षांपासून आयोजन करणारी भारतातील पहिली महानगरपालिका

**(पान ३ वर)**

# शहरातील विकासकामांची मनपा आयुक्तांकडून पाहणी

**नाशिक** : शहरातील विविध ठिकाणी प्रगतीपथावर होणारी विकासकामांची संयुक्त पाहणी दौरा मनपा आयुक्त अभिषेक कृष्णा यांनी केला. नाशिक शहराची प्राचिन तिर्थक्षेत्र म्हणून ओळख असून तसेच औद्योगिक शहर म्हणूनही उद्योमुखास येत असलेल्या नाशिक शहरातील मुख्य रस्त्यावरील चौक तसेच रस्ता दुभाजक विकसन तसेच सुशोभिकरणाचे काम प्रगतीपथावर होत आहे. त्या अनुषंगाने नाशिक शहरात प्रवेश करतांना शहराची ओळख व भव्यता ही प्रवेशद्वाराजवळ होण्यासाठी मुंबई आग्रा महामार्गावरील विल्होळीनाका, गरवारे चौक, पाथर्डीफाटा, लेखानगर तसेच मुंबईनाका याठिकाणी यापूर्वीच कामास मंजुरी मिळून या कामांना कार्यादेश देण्यात आले आहेत. त्यामध्ये सिव्हिल वर्क, लॅण्ड स्केपिंग, प्लंबिंग इ. कामांचा समावेश आहे. यासर्व कामांची पाहणी मनपा आयुक्त अभिषेक कृष्णा, शहर अभियंता यू.बी. पवार, सहाय्यक आयुक्त शहर वाहतूक शाखा तसेच प्रोजेक्ट डायरेक्टर (NHAI) यांच्यासह अधिकाऱ्यासमवेत संयुक्त पाहणी केली. मनपा आयुक्त अभिषेक कृष्णा यांनी मार्गदर्शन केले. तसेच विकास कामांची देखभालीसाठी शहरातील नामवंत संस्थेकडून (CSR) अंतर्गत १० वर्षांसाठी करारनामा करून घेण्यात आला आहे. विल्होळी येथे प्रवेशद्वार विकसित करून सुशोभिकरण केले जाणार आहे.

या कामात प्रमुख्याने वेलकम वॉल (१२० बाय ४ मीटर) मध्ये वेलकम नाशिक नावाची अक्षरे मेटलमध्ये असून त्याची उंची ६ फूट इतकी असणार आहे. या भिंतीवर प्रकाश योजना करण्यात येणार आहे. या विकासकामांमध्ये स्टेप गार्डन, लॅण्ड स्केपिंग, रोडस्, इ.चा समावेश केला गेला आहे. या कामाच्या जागेत असलेल्या मुकणे धरणातून थेट पाईपलाईन योजनेचे काम त्वरित सुरू करण्याच्या सुचना मनपा आयुक्त अभिषेक कृष्णा यांनी दिल्या आहेत. या विकास कामांमध्ये एच.ए.एल कंपनीने सी.एस.आर. अंतर्गत देशातील नागरिकांमध्ये वायुसेनेबाबत जागरूकता वाढविण्यासाठी मिग-२१, सुखोई-३० यांचे मॉडेल ठेवणार असून संपूर्ण प्रकल्पाची १० वर्षांसाठी देखभाल करण्यात येणार आहे. तसेच गरवारे चौक, पाथर्डीफाटा, लेखानगर चौकात वाहतुकीच्या दृष्टीने विकसन करून सुशोभिकरण करण्यात येणार आहे. ही कामे वाहतूक सुरळीत होण्याच्या दृष्टिने वाहतूक पोलीस विभाग व एनएचएआय विभागाचे मार्गदर्शन घेऊन कामे त्वरित पूर्ण करण्याच्या सुचना मनपा आयुक्त अभिषेक कृष्णा यांनी दिल्या. तसेच मुंबईनाका चौकात मायलॅन कंपनीने सी.एस.आर. अंतर्गत आयलॅण्ड विकसित केले. उर्वरित चौकात चॅनलायझरचे विकसन तसेच फुटपाथ लॅण्ड स्केपिंग इ. करून संपूर्ण चौकांचा विकास करण्यात येणार आहे. त्याचबरोबर नाशिकरोड विभागातील जयभवानी मार्गालगत जेतवननगर येथील नियोजित नाट्यगृहाच्या जागेची पाहणी करून व प्रगतीत असलेल्या आरक्षण क्र. १७१ मधील क्रीडांगण विकसित कामाची पाहणी केली. हे काम येत्या डिसेंबरपर्यंत पूर्ण करण्याच्या सुचना आयुक्तांनी दिल्या आहेत.

नाशिक महानगरपालिका क्षेत्रात शासनाने मंजुर केलेल्या अमृत अभियान हरित क्षेत्र विकास प्रकल्पातंर्गत पंचवटी विभागातील स.नं. ४०० तवली डोंगर, मखमलाबाद शिवार, पेठरोड, येथे विकसित होणाऱ्या हरित वन उद्यान, अमृत वन उद्यानात करण्यात येणाऱ्या कामा संदर्भात व प्रामुख्याने पेठरोड ते अमृतवन उद्यान तवली डोंगर येथे जाणारा रस्ता विकसित करणे, पंचवटी विभागात रस्ताचे दुर्तफा व विविध ठिकाणी लागवड करण्यात आलेल्या वृक्ष लागवड कामांची पाहणी करून त्याची पुढील १ वर्ष देखभालीच्या व पंचवटी विभागातील पेठरोडवरील ओंकारनगर वगैरे विविध उद्यानाची पाहणी करून उद्यान देखभाल नियमित करणेचे कामाबाबत सुचना दिल्यात याप्रसंगी शहर अभियंता यु.बी. पवार, उद्यान अधिक्षक बी.यु. मोरे, उपअभियंता नितीन पाटील, व इतर अधिकारी उपस्थित होते.

# द्वारका वाहतुकीसाठी सिग्नल यंत्रणा; मोबालिटी सेलच्या बैठकीत विविध उपाययोजना

**नाशिक** : द्वारका सर्कल भागात होणारी वाहनांची कोंडी, नागरिकांकडून होत असलेली गतिरोधकांची मागणी तसेच विविध ठिकाणी लावण्यात येणारे सिग्नल अश्या शहरातील वाहतूक विषयक समस्या निवारणाकामी व नियोजन होणे कामी मोबिलिटी सेलची महानगरपालिका आयुक्त अभिषेक कृष्णा यांचे अध्यक्षतेखाली बैठक पार पडली.

या नाशिक सिटी मोबोलिटी सेलच्या बैठकीत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, आर.टी.ओ. सहाय्यक पोलीस आयुक्त, शहर वाहतूक विभागीय नियंत्रक, एस.टी. महामंडळ, कार्यकारी अभियंता, नगररचना, मनपा आय.टी.डी.पी.चे. प्रतिनिधी नाशिक फस्ट सेवाभावी संस्था, यु.एम.टी.सी. दिल्ली, तज्ञ सल्लागार संस्था, कार्यकारी अभियंता (बांधकाम), मनपा कार्यकारी अभियंता (विद्युत), मनपा कार्यकारी अभियंता (सार्वजनिक बांधकाम) महाशासन कार्यकारी अभियंता रा.म. विभाग, प्रकल्प अधिकारी एनएचएआय, अधिक्षक अभियंता महावितरण, विभागीय अभियंता, भारत संचार निगम लि., मिळकत व्यवस्थापक, मनपा या विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



या बैठकीमध्ये द्वारका चौकातील वाहतूक कोंडी सोडविणे बाबत सविस्तर चर्चा झाली. द्वारका चौकातील वाहतूक बेट काढून हाकणे, सिग्नल यंत्रणा कार्यान्वित करणे, रिक्षा व टॅक्सीचे अनाधिकृत थांबे त्वरीत हटविणे व पुरेसे पोलीसबळ देखरेखीसाठी उपलब्ध करणे तसेच पुण्याकडून मुंबईकडे जाणाऱ्या वाहतुकीसाठी आवश्यक वळण रस्ता उपलब्ध करणे, इ. बाबींवर चर्चा झाली. यासाठी एनएचएआय यांनी अभ्यास करून उचित कार्यवाही करणेचे निश्चित केले. नाशिक शहरातील मुख्य रस्त्यावरील विविध २० ठिकाणी असलेल्या अपघात प्रवण स्थळांबाबत (ब्लॅकस्पॉट) सर्व संबधित विभागाचे अधिकारी यांनी त्वरीत एकत्रित प्रत्यक्ष अपघात प्रवण स्थळांना भेट देऊन त्वरित तात्पुरत्या व कायमस्वरूपी उपाययोजना सुचविल्या. शहरातील महत्वाच्या व वाहतूक समस्या असलेल्या चौकांना सिग्नल यंत्रणा बसविणेकामी प्राधान्यक्रम पुढील एक महिन्यात कार्यवाही करणेबाबत व सिग्नल यंत्रणेमध्ये पादचाऱ्यांना रस्ता ओलांडणे कामी पुरेसा कालावधी उपलब्ध करून देणे बाबत सुचित करण्यात आले आहे. नाशिक शहरामध्ये विविध ठिकाणी होत असलेली गतीरोधक निर्माण करणेची वाढती मागणीचा विचार होऊन उच्च न्यायालयाचे आदेश प्रमाणे पोलीस उपआयुक्त शहर वाहतूक विभाग यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित समितीचे मार्फत कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला. नाशिक शहराची सर्वकष वाहतूक आराखडा तयार करण्यात आलेला असून नागरिकांच्या सुचनांचा समावेश करून अंतिम सर्वकष वाहतूक आराखडा लवकरच मनपा सादर करण्यात येणार आहे असे तज्ञ सल्लागार यांनी बैठकित सांगितले. तसेच नाशिक शहरात निर्माण करावयाच्या पार्किंग सुविधांबाबत तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी असे आदेश मनपा आयुक्त अभिषेक कृष्णा यांनी दिली. सर्व बाबींवर बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

**(पान २ वरून)** ठरल्याबद्दल कल्पना युथ फाऊंडेशनचे उपाध्यक्ष प्रोफेसर भूषण उगले यांनी नाशिक महानगरपालिकेचे अभिनंदन केले. याप्रसंगी मार्गदर्शन करतांना महापौर रंजना भानसी यांनी नाशिकमधील विद्यार्थ्यांमध्ये खगोलशास्त्र व अंतराळ संशोधनात रुची निर्माण करण्यासाठी गेल्या पाच वर्षांपासून भरीव कामगिरी करणाऱ्या 'कल्पना युथ फाऊंडेशन' ला विशेष शुभेच्छा दिल्या. तसेच यापुढेही असेच प्रेरणादायी कार्य पुढे चालू ठेवावे व अंतराळ संशोधनात कल्पना चावलांचा वारसा विद्यार्थ्यांनी पुढे ठेवावा असे प्रतिपादन केले. यासाठी





महानगरपालिकेची मदत सदैव राहील असे सांगितले.

याप्रसंगी महापौर रंजना भानसी, स्थायी समिती सभापती शिवाजी गांगुर्डे, अतिरिक्त आयुक्त किशोर बोर्डे, शहर अभियंता उत्तम पवार, शिक्षणाधिकारी नितीन उपासनी, कार्यकारी अभियंता रामसिंग गांगुर्डे, मानद व्यवस्थापक प्रकाश साळवे, तारांगणचे के.एस. बैरागी, कल्पना युथ फाऊंडेशनचे अध्यक्ष जयदीप शहा, उपाध्यक्ष भूषण उगले, नासा स्पेस एज्युकेटर अपूर्वा जाखडी, इस्रोचे माजी अभियंता अविनाश शिरोडे तसेच सुशांत राजोळे, हेमंत आढाव, पवन कदम, दिपक तरवडे आणि केंब्रिज इंटरनॅशनल स्कूलचे विद्यार्थी उपस्थित होते. उद्घाटनानंतर विद्यार्थ्यांना तारांगणातील 'शो' दाखविण्यात आला.

# मुकणेधरण पाणीपुरवठा योजनेच्या कामांची आयुक्तांकडून पाहणी

**नाशिक** : केंद्राच्या जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान नाशिक महापालिके मार्फत राबविण्यात येणाऱ्या मुकणे धरण पाणीपुरवठा योजनेच्या कामाची मनपा आयुक्त अभिषेक कृष्णा यांनी पाहणी केली.

यावेळी आयुक्त अभिषेक कृष्णा यांनी मुकणे धरण जलाशय येथील हेडवर्क्सच्या कामांची पाहणी केली. तसेच पाटबंधारे विभागाकडे कामाचा पाठपुरवा करून योजनेचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी नियोजन करावयाच्या सुचना दिल्या. यावर्षी झालेल्या पावसामुळे मुकणे धरणात साधारण ९५% इतका जलसाठा झालेला असून, मागील १० वर्षात पहिल्यांदाच एवढा जलसाठा झालेला आहे. या जलसाठ्यामुळे धरण जलाशयातील हेडवर्क्सची कामे बंद झालेली आहे. सद्यस्थितील हेडवर्क्सच्या कामाची प्रगती ५५% झालेली आहे. तथापी धरणातील पाण्याची पातळी कमी झाल्याशिवाय हेडवर्कसची उर्वरित कामे सुरू करणे शक्य होणार नाही. पाण्याची पातळी लवकरात लवकर कमी करून मिळणे करिता रोटेशन लवकर सोडणेसाठी पाटबंधारे विभागाकडे पाठपुरवठा करणे बाबतच्या सुचना मनपा आयुक्त अभिषेक कृष्णा यांनी पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या. यानंतर मनपा आयुक्त अभिषेक कृष्णा यांनी मुंबई महामार्गालगत राजुरफाटा, वाडीवऱ्हे, रायगडनगर, जैन मंदिर येथे सुरू असलेल्या पाईपलाईनच्या कामाची पाहणी केली. सद्यस्थितीत पाईपलाईनच्या कामाची प्रगती ६० टक्के पर्यंत पूर्ण झालेली आहे. ही पाईपलाईन मुकणे धरणापासून विल्होळी नाक्यालगत उभारण्यात येत असलेल्या जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत टाकली जाणार आहे. उर्वरित काम मार्च २०१८ पर्यंत पूर्ण करण्याच्या सुचना आयुक्त अभिषेक कृष्णा यांनी दिल्या आहे. तसेच विल्होळी जकात नाका परिसरात सुरू असलेल्या जलशुद्धीकरण केंद्राच्या कामाची पाहणी मनपा आयुक्त अभिषेक कृष्णा यांनी केली. या विल्होळी जकात नाका येथे सुरू असलेल्या जलशुद्धीकरण केंद्राच्या कामाची प्रगती देखील ७० टक्के पर्यंत पूर्ण झाले आहे, आणि उर्वरित काम मार्च २०१८ पर्यंत पूर्ण करण्याच्या सुचना मनपा आयुक्त अभिषेक कृष्णा यांनी केल्या.









# महापौरांच्या हस्ते महापालिकेत ‘लक्ष्मीपूजन’





**नाशिक** : मनपा मुख्यालय राजीव गांधी भवन येथील कोषागारातील तिजोरीचे महापौर रंजना भानसी व त्यांचे पती पोपटराव भानसी तसेच अतुल भानसी व दिपाली भानसी यांचे हस्ते विधिवत लक्ष्मीपूजनाचा कार्यक्रम करण्यात आला. मनपा मुख्यालयात झालेल्या लक्ष्मीपूजनाच्या कार्यक्रमास उपमहापौर प्रथमेश गिते, स्थायी समिती सभापती शिवाजी गांगुर्डे, सभागृह नेत दिनकर पाटील, उपायुक्त हरिभाऊ फडोळ, आर.एम. बहिरम, शहर अभियंता उत्तम पवार, मुख्य लेखाधिकारी सुभाष भोर, मुख्यलेखापरीक्षक महेश बच्छाव, अग्निशमन दल प्रमुख अनिल महाजन, गुलाब गावित, बाळासाहेब शिंदे, नितीन गंभीरे, अजय कमोद, हसंराज वर्मा, वैभव मोटकरी, गोकुळ राऊत, अजय शिरसाठ, संतोष कान्हे, विरसिंग कामे, हुसेन पठाण, विशाल घागरे, तसेच मनपा पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# वृक्षगणनेत २५ लाख ६९ हजार १९२ झाडांची गणना

**नाशिक** : महानगरपालिकेने शहरातील खाजगी कंपनीकडून १० महिने ७ दिवसांच्या कमी कालावधीमध्ये २५ लाख ६९ हजार १९२ वृक्षगणना करण्याचे अपेक्षित उद्दिष्ट्ये पूर्ण केले असून उर्वरित काम प्रगतीपथावर करण्यात येत आहे. नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुमारे ३१ ते ३२ लक्ष वृक्ष आढळण्याचा अंदाज वर्तविला जात आहे.

नाशिक महानगरपालिका हि इतक्या कमी कालावधीत २५ लाखापेक्षा जास्त वृक्षगणना करणारी भारतातील पहिली महानगर पालिका ठरू शकते. नोव्हेंबर २०१६ पासून वृक्षगणनेचे काम मे. टेराकॉन इफोटेक प्रा.लि. संस्थेकडून सुरू करण्यात आले हे काम २० डिसेंबर २०१७ पर्यंत गणना पूर्ण करण्याची मुदत संबंधित खाजगी कंपनीला दिली गेली आहे. आतापर्यंत १९८ वृक्षांच्या विविध प्रजाती आढळून आल्या आहेत. त्यापैकी २५ औषधी गुणधर्म असलेल्या प्रजाती व ६१ फळझाडांच्या प्रजाती आढळल्या आहे. तसेच दुर्मिळ वृक्षांच्या ४७ प्रजाती आढळून आल्या आहे. या वृक्षगणनेत प्रामुख्याने रूद्राक्ष, महारूख, माकड, लिंबू, दांडूस, शेंद्रा, वाटक्ष, मुजकुंद, सुरंगी, राई आवळा, रबर ट्रि इ. प्रजातीच्या वृक्ष कमी प्रमाणात आढळून आल्या आहेत. महापालिकेच्या एकूण ३१ प्रभागापैकी १८ प्रभागांचे काम पूर्ण झाले असून सद्यस्थितीत १२ प्रभागामध्ये वृक्ष गणनेचे काम युद्धपातळीवर चालू आहे. यापैकी सुमारे ५ प्रभागांमध्ये ९० टक्के अधिक वृक्षगणनेचे काम पूर्ण झाले असून येत्या काही दिवसात उर्वरित कामे प्रगती पथावर पूर्ण करण्यात येणार आहे.

सर्व छायाचित्र : संतोष कान्हे, विरसिंग कामे

स्मार्ट नाशिक सिटी
नाशिक महानगरपालिका खाजगी प्रकाशन
संपादित व प्रकाशित : अभिषेक कृष्णा आयुक्त,
अतिरिक्त आयुक्त रमेश पवार, उपायुक्त हरिभाऊ फडोळ
संपादकीय समन्वयक : चेतन श्रीराम घरटे (ग्लोबल सेलोरा सिस्टम)